


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६६ वा | बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR




# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दात कोरून केलेल्या दानाची नव्हे, सरकारी तिजोरीतील हक्काची मदत हवी !

## जनतेचा खिसा आधीच फाटका; मुख्यमंत्री, मंत्री, आमदारांनी आधी स्वतःच्या खर्चाला कात्री लावावी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रावर दुष्काळाचे भीषण संकट घोंघावत असताना जनतेने अनावश्यक खर्च टाळावा, लग्नसमारंभ, बारसे, मुंज आदी कार्यक्रमांवरील खर्च कमी करावा आणि वाचलेला पैसा दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी वापरावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. नागरिकांनी संवेदनशीलता दाखवावी, पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असेही त्यांनी म्हटले आहे. राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, सरकारने मदत व पुनर्वसनाच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांचे हे आवाहन संवेदनशीलतेच्या दृष्टीने योग्य असले, तरी दुष्काळाचे ओझे पुन्हा सामान्य जनतेच्या खांद्यावर टाकून प्रश्न सुटणार आहे का? हा खरा सवाल आहे. कारण जनतेचा खिसा आधीच महागाईने फाटलेला आहे. त्यात दुष्काळाने शेतीचे उत्पन्न, रोजगार, बाजारपेठ आणि घरातील बचत यांनाही मोठा धक्का बसला आहे. अशा परिस्थितीत सामान्य माणसाने आणखी बचत करून त्यातून दुष्काळग्रस्तांना मदत करावी, अशी अपेक्षा कितपत वास्तववादी आहे?

दुष्काळग्रस्तांना दात कोरून जमविलेल्या पुंजीची गरज नाही; त्यांना शासनाच्या तिजोरीतून तातडीची, पुरेशी आणि हक्काची मदत हवी आहे.

**पहिली सुरुवात सत्ताधाऱ्यांनी स्वतःपासून करावी**

जनतेने मदत करावी, हे सांगण्यापूर्वी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, सत्ताधारी आमदार-खासदार यांनी स्वतःच्या खर्चाला कात्री लावण्याचा आदर्श घालून द्यावा. सरकारी यंत्रणेतील अनावश्यक खर्च, दिखाऊ कार्यक्रम, गैरआवश्यक प्रकल्प आणि विलंबित निर्णयांमुळे होणारा खर्च रोखून तो पैसा दुष्काळ निवारणाकडे वळविण्याची गरज आहे.

दुष्काळग्रस्त भागात शेतकरी पिके वाचविण्यासाठी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. विहिरी कोरड्या पडत आहेत, चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. मुख्यमंत्री स्वतः दुष्काळग्रस्त भागात गेले असून त्यांनी परिस्थिती गंभीर असल्याचे म्हटले आहे.

मग प्रश्न एवढाच आहे—ज्या संकटाची तीव्रता सरकारला प्रत्यक्ष दिसत आहे, त्या संकटाचा आर्थिक भार उचलण्याची पहिली जबाबदारी सरकारची नाही का?

**'खर्च कमी करा'पेक्षा 'अनावश्यक सरकारी खर्च थांबवा'**

मुख्यमंत्र्यांनी जनतेला खर्च कमी करण्याचे आवाहन करण्याऐवजी सरकारी यंत्रणेला स्पष्ट आदेश देण्याची गरज आहे—

'अनावश्यक खर्च थांबवा, दुष्काळग्रस्तांचा पैसा दुष्काळग्रस्तांसाठीच वापरा.'

ठेकेदारी, मोठे प्रकल्प, अनावश्यक कामे आणि सरकारी खर्चाच्या प्राधान्यक्रमाची कठोर छाननी झाली पाहिजे. दुष्काळाच्या काळात कोणते काम अत्यावश्यक आहे आणि कोणते काम काही महिने पुढे ढकलता येऊ शकते, याचा निर्णय घेण्याची हीच वेळ आहे.



**दुष्काळ जाहीर झाला; आता मदत कागदावर नको, बांधावर हवी!**

राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. सरकारने १२ तातडीच्या उपाययोजनांना मंजुरी दिल्याचे आणि शेतकऱ्यांना मदत देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले आहे.

मात्र शेतकऱ्याला आता घोषणेपेक्षा प्रत्यक्ष मदत हवी आहे. पंचनामे, सर्वेक्षण, प्रस्ताव, मंजुरी आणि कागदोपत्री प्रक्रिया यामध्ये मदत अडकून पडता कामा नये. सरकारनेही दुष्काळ जाहीर करणे पुरेसे नसून प्रत्यक्ष दुष्काळ निवारणाची पावले उचलणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.

आज शेतकऱ्याला पीक वाचवण्यासाठी पैसा हवा आहे. जनावरांसाठी चारा हवा आहे. कुटुंबासाठी पाणी आणि अन्नधान्य हवे आहे. पुढील रब्बी हंगामासाठी बियाणे आणि आर्थिक आधार हवा आहे.

दरम्यान, राज्यातील अभियंते आणि कंत्राटदारांच्या संघटनांनीही काही अनावश्यक सरकारी खर्च कमी करून दुष्काळ निवारणासाठी निधी वळविण्याची भूमिका मांडल्याचे वृत्त आहे.

**कमिशनखोरीचे आरोप असतील तर चौकशी करा; पैसा वाचवा**

सरकारी कंत्राटांमध्ये भ्रष्टाचार, कमिशन किंवा अनियमिततेचे आरोप वारंवार होत असतील, तर त्यांची स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी झाली पाहिजे. आरोप सिद्ध झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविणे योग्य नाही; पण आरोपांची चौकशी न करणेही योग्य नाही.

दुष्काळाच्या काळात प्रत्येक रुपयाचा हिशेब जनतेसमोर ठेवण्याची वेळ आली आहे. कोणत्या विभागाचा किती अनावश्यक खर्च थांबविला? त्यातून किती निधी वाचला? तो निधी किती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला? याचा सार्वजनिक लेखाजोखा सरकारने द्यायला हवा.

**आमदार-खासदारांच्या एका महिन्याच्या वेतनाने काय होणार?**

सत्ताधारी आमदार-खासदारांनी एक महिन्याचे वेतन दुष्काळग्रस्तांना देण्याची घोषणा केली, तर त्यातून प्रतीकात्मक संदेश नक्कीच जाऊ शकतो. मात्र महाराष्ट्रासारख्या राज्यव्यापी संकटासाठी अशा प्रतीकात्मक मदतीपेक्षा सरकारी धोरणात्मक निधीची गरज अधिक मोठी आहे.

म्हणूनच दानधर्माच्या घोषणा करण्यापेक्षा सरकारी खर्चाचे पुनर्विनियोजन महत्त्वाचे आहे.

दुष्काळ हा फोटो काढण्याचा किंवा मदतीच्या घोषणा करण्याचा विषय नाही; तो लाखो कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न आहे.

**सरकारच्या तिजोरीला कुलूप आणि जनतेच्या खिशाला हात नको!**

दुष्काळाच्या नावाखाली जनतेनेच आपापल्या खिशातून मदत करावी, अशी अपेक्षा करणे सोपे आहे. पण राज्यकारभाराचा अर्थच असा आहे की संकटाच्या काळात सरकारने आपल्या आर्थिक साधनसंपत्तीचा उपयोग नागरिकांच्या संरक्षणासाठी करावा.

महाराष्ट्रातील जनता संकटात असताना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री आणि सत्ताधारी लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या खर्चाचा सार्वजनिक आढावा जाहीर करावा. अनावश्यक दौरे, समारंभ, जाहिराती आणि इतर खर्चांमध्ये कपात करून तो पैसा दुष्काळ निवारणासाठी वळवता येतो का, याचा विचार करावा.

जनतेने फूल ना फुलाची पाकळी दिली तरी त्या पाकळीने महाराष्ट्राचा दुष्काळ संपणार नाही.

म्हणूनच सरकारसमोरचा खरा प्रश्न आहे—

जनतेच्या घरातील बचतीवर दुष्काळ निवारणाची जबाबदारी टाकायची की सरकारी तिजोरीतील प्रत्येक उपलब्ध रुपया शेतकऱ्याच्या मदतीसाठी वापरायचा?

दुष्काळग्रस्त महाराष्ट्राला उपदेश नकोत.

त्याला पाणी, चारा, पीक मदत, कर्जसवलत आणि जगण्याचा आर्थिक आधार हवा आहे.

मुख्यमंत्र्यांनी जनतेला बचतीचे आवाहन केले आहे; आता त्यांनी सरकारलाही बचतीचा आणि खर्चाच्या पुनर्विनियोजनाचा आदेश देऊन दाखवावा.

कारण शेवटी प्रश्न दानाचा नाही—

प्रश्न आहे, संकटात सापडलेल्या महाराष्ट्राच्या शेतकऱ्याला सरकार त्याचा हक्काचा पैसा कधी देणार?

# सोलापूर जिल्ह्यातील 11 तालुक्यांत दुष्काळ, 100 टक्के क्षेत्राचे पंचनामे 8 दिवसांत पूर्ण करा- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने खरीप हंगाम 2026 मध्ये ट्रिगर-1 नुसार दुष्काळ जाहीर केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील 11 तालुक्यांमध्ये हा निर्णय लागू झाला आहे. जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी महसूल, ग्रामविकास व कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन 100 टक्के शेती क्षेत्राच्या नुकसानीचे पंचनामे पुढील आठ दिवसांत पूर्ण करून अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सन 2026 खरीप हंगामातील ट्रिगर-1 दुष्काळाच्या अनुषंगाने विविध उपाययोजना करण्याबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) अंजली मरोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख श्री. मगर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. अनिल तांबे, विशाल येवले यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित होते. सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, भूमी अभिलेख तसेच जलसंधारण विभागाचे तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, जिल्ह्यातील 11 पैकी 11 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला असून, शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी सरसकट पंचनामे करा. एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्या. पंचनाम्याचा अहवाल आठ दिवसांत सादर करा. सद्यस्थितीत पंचनामे करताना 10 टक्के नमुना पाहणी न करता प्रत्येक शेतात, प्रत्येक बांधावर जाऊन जे नुकसान दिसेल, ते सर्व पंचनाम्यात नोंदवावे. तसेच जिओ-टॅगिंगसह पंचनामे करावेत, असेही त्यांनी सूचित केले.

एसआयआरचे काम असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी एसआयआरचे काम दोन दिवस वगळता उर्वरित सर्व वेळ पंचनाम्याच्या कामालाच प्राधान्य द्यावे. सर्व तहसीलदारांनी ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी व कृषी सहाय्यक यांचे आदेश आजच काढावेत. सर्व गावांमध्ये पंचनामे पूर्ण गतीने सुरू करावेत. चुकीचे पंचनामे करू नयेत. दररोज सायंकाळी एकूण क्षेत्र व झालेले पंचनामे यांचा



गोषवारा सादर करावा. तसेच सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि प्रांताधिकारी यांनी कोणत्याही परिस्थितीत टँकर मागणीचा प्रस्ताव आल्यास त्यास 48 तासांत मंजुरी मिळेल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

तसेच गावामध्ये टँकर प्रस्तावाला मंजुरी देताना रस्ते लहान असतील तर मोठ्या टँकरऐवजी छोटा टँकर देण्याबाबत विचार व्हावा. टँकर मागणीचे प्रस्ताव टपालामध्ये न देता संबंधित अधिकाऱ्याकडे तात्काळ उपलब्ध करून द्यावेत. गावामध्ये एकाच ठिकाणी टँकर उभा करून त्या ठिकाणाहून पाणी वितरण करावे. टँकरला जीपीएस बसविलेला असला पाहिजे. टँकरच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास 24 तासांच्या आत त्या गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू झाला पाहिजे, या दृष्टीने नियोजन करावे.

सध्या 100 ते 120 दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध असला तरी पशुसंवर्धन विभागाने गावनिहाय व तालुकानिहाय चारा उपलब्धतेबाबत नियोजन करून दोन दिवसांत अहवाल सादर करावा. तसेच नियोजन समितीमधून चारा बियाणे खरेदीसाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला असून, आजच प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

पुरवठा विभागाने अंत्योदय तसेच प्राधान्यक्रम योजनेचे कार्डधारक वगळून इतर रेशन कार्डधारकांची माहिती तयार करून त्याप्रमाणे धान्याची मागणी शासनाकडे नोंदवावी व त्याबाबतचा अहवाल एका आठवड्यात सादर करावा. उजनी धरणामध्ये 92 टक्के पाणीसाठा आहे. परंतु लहान व मध्यम प्रकल्पांतील पाणीसाठ्याबाबत सूक्ष्म नियोजन करून त्याबाबतचा अहवाल सोमवारपर्यंत सादर करावा.

नगरपालिका प्रशासन विभागाने जिल्ह्यातील सर्व नगरपालिका क्षेत्रांत उपलब्ध पाणी किती दिवस पुरेल व पुढे पाणीपुरवठ्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करावा, असेही जिल्हाधिकारी यांनी सूचित केले.

सर्व प्रांताधिकारी व तहसीलदार यांनी मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्त्यांची किमान 250 कामे प्रशासकीय मान्यता स्तरावर आणून ठेवावीत. तसेच व्हीजी रामजी योजनेअंतर्गत 941 ग्रामपंचायतींमध्ये 723 मंजूर कामांपैकी दुष्काळाच्या अनुषंगाने कामे तात्काळ सुरू करण्याबाबत ग्रामपंचायत विभागाने पुढाकार घ्यावा. ही कामे 31 मार्च 2027 पर्यंत सुरू राहतील, या दृष्टीने नवीन कामे प्रस्तावित करावीत.

मृद व जलसंधारण विभागाने दुष्काळी गावांमध्ये जलसंधारणाची कामे मोघमपणे प्रस्तावित न करता काटेकोरपणे नियोजन करून निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने कामे घ्यावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये दुष्काळी उपाययोजना राबविताना प्रत्येक विभागाने अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून केलेल्या नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सूचित केले.

प्रारंभी मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ते, नरेगा, विविध जलाशयांची स्थिती, धान्य उपलब्धता, चारा, पंचनामे, टँकर मागणी प्रस्ताव आदी बाबींबाबत संबंधित विभागप्रमुखांनी बैठकीत माहिती सादर केली.

सोलापूर जिल्ह्यात दि. 28-09-2026 अखेर मंजूर टंचाई उपाययोजनांची तालुकानिहाय माहिती

सोलापूर जिल्ह्यात सध्या एकूण 92 गावांमध्ये टंचाई उपाययोजना मंजूर आहेत. तालुकानिहाय माहिती अशी : बार्शी तालुक्यात 12 गावांमध्ये 2 टँकर मंजूर असून, 5 विहिरी व 5 बोअर अधिग्रहित करण्यात आले आहेत. करमाळा तालुक्यात 11 गावांमध्ये 8 टँकर, 8 विहिरी व 2 बोअर मंजूर आहेत. मंगळवेढा तालुक्यात सर्वाधिक 16 गावांमध्ये 18 टँकर मंजूर असून, विहीर व बोअर अधिग्रहण नाही. मोहोळ व पंढरपूर तालुक्यांमध्ये सध्या एकही टँकर, विहीर किंवा बोअर मंजूर नाही. उत्तर सोलापूर तालुक्यात 5 गावांमध्ये 7 टँकर मंजूर आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यात 1 गावासाठी 1 टँकर मंजूर आहे. सांगोला तालुक्यात 19 गावांमध्ये सर्वाधिक 24 टँकर मंजूर असून, विहीर/बोअर अधिग्रहण नाही. माढा तालुक्यात 13 गावांमध्ये 13 टँकर, 10 विहिरी व 3 बोअर मंजूर आहेत. अक्कलकोट तालुक्यात 8 गावांमध्ये 2 टँकर, 3 विहिरी व 3 बोअर मंजूर आहेत. माळशिरस तालुक्यात 7 गावांमध्ये 7 टँकर व 7 विहिरी मंजूर असून, बोअर अधिग्रहण नाही.

# दुष्काळी परिस्थितीत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या रजांवर निर्बंध

## मुख्यालय सोडण्यासाठी पूर्वपरवानगी बंधनकारक

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील प्रशासन यंत्रणा सतर्क व गतिमान ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. कार्तिकेयन यांनी जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या रजा मंजुरी व मुख्यालय सोडण्याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

सोलापूर जिल्ह्यासह राज्यात पाणीटंचाई, चाराटंचाई व पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक व मानसिक संकटाला सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणे आवश्यक असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

**मुख्यालय सोडण्यासाठी पूर्वपरवानगी आवश्यक**

महसूल, कृषी, ग्रामविकास, अन्नधान्य पुरवठा, नगरविकास, भूमिअभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, सोलापूर विद्यापीठ, सहकार, शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, भूजल सर्वेक्षण, नीरा उजवा कालवा, हेस्कॉम पंप हाऊस विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मत्स्य विभाग, जिल्हा माहिती कार्यालय तसेच मृद व जलसंधारण आदी विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन व शेतकरी सहाय्याची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

दुष्काळी परिस्थिती सुरू असेपर्यंत संबंधित विभागांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे.

**रजा मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे-**

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नमूद विभागांतील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कोणत्याही प्रकारच्या रजा, तसेच जिल्ह्याबाहेर जाण्यासाठीची परवानगी केवळ जिल्हाधिकारी (पान 2 वर..)

# सोलापूरकरांनो, पाणी जपून वापरा!

## आता पाच दिवसांआड पाणीपुरवठा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दोन महत्त्वाच्या मुख्य जलवाहिन्या नादुरुस्त झाल्याने शहरातील पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम होणार आहे. या दोन्ही जलवाहिन्यांच्या दुरुस्तीचे काम सोमवार, २८ सप्टेंबरपासून सोलापूर महानगरपालिकेने हाती घेतले आहे. दुरुस्तीला बराच कालावधी लागणार असल्याने मंगळवार, २९ सप्टेंबरपासून शहरातील चार दिवसांआडचा पाणीपुरवठा एक दिवसाने पुढे ढकलला जाणार असून, एका फेरीसाठी पाच दिवसांचे अंतर राहणार आहे.



सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्र परिसरात सोरेगाव ते जुळे सोलापूरदरम्यानची १२०० मिमी व्यासाची मुख्य पंपिंग जलवाहिनी नादुरुस्त झाली आहे. त्याचबरोबर जामगुंडे मंगल कार्यालयाच्या पाठीमागे रेल्वे ट्रॅकजवळ ७६२ मिमी व्यासाची मुख्य पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी नादुरुस्त झाली आहे.

या दोन्ही ठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून, त्याचा परिणाम उजनी जलवाहिनीवरील पाणीपुरवठ्यासह भवानी पेठ जलशुद्धीकरण केंद्र आणि सिव्हिल हॉस्पिटलजवळील उच्चस्तरीय पाण्याच्या टाकीवर अवलंबून असलेल्या भागांवर होणार आहे.

महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयाने नागरिकांना उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# परीक्षेची अट नाही, ना ट्रेनिंग, अग्निवीरांना थेट सरकारी नोकरी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र सरकारने भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून सेवा बजावणाऱ्या जवानांना निवृत्तीनंतर शासकीय सेवेत कोणत्याही अटीशिवाय सामावून घेण्याचा निर्णय घेतला आहे. खरंतर भारतीय सैन्यात नोकरी करावी, असं अनेक महाराष्ट्रातील तरुणांचं स्वप्न असतं. अनेक तरुण या स्वप्नासाठी अक्षरशः पछाडलेले असतात. अनेक तरुण हे देशसेवेसोबतच सरकारी नोकरी मिळावी यासाठी देखील भारतीय सैन्याच्या परीक्षेची तयारी करतात. केंद्र सरकारने काही वर्षांपूर्वी भारतीय सैन्यात भरती होण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांसाठी अग्निवीर योजना जाहीर केली होती. या योजनेच्या माध्यमातून परीक्षा पास झाल्यानंतर जवान चार वर्षांची सेवा भारतीय सैन्यात करतात. त्यानंतर



ते निवृत्त होतात. पण त्यानंतरही त्यांना अनेक शासकीय योजनांचा लाभ मिळतो.

याच अग्निवीरांच्या पंखांना बळ देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महाराष्ट्राच्या मातीत जन्माला आलेल्या अग्निवीरांना भारतीय सैन्यातून चार वर्षांची सेवा करुन निवृत्ती मिळाल्यानंतर त्यांना आता राज्य शासनामध्ये सरकारी नोकरी मिळणार आहे. पोलीस खात्यापासून विविध विभागात या अग्निवीरांना संधी दिली जाणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः याबाबत माहिती दिली आहे.

(पान 2 वर..)



## संपादकीय

# शैक्षणिक अस्वस्थता

देशाच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सध्या जी उलथापालथ सुरू आहे, त्याहीपेक्षा शैक्षणिक क्षेत्रात सध्या मोठी अस्वस्थता निर्माण झाली असून ती अधिक चिंताजनक आहे.

शिक्षण क्षेत्र हे सार्वजनिक जीवनातील एक पवित्र क्षेत्र मानले जाते, आणि ते राजकारण तसेच भेदभाव मुक्त असावे, तिथे विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य असावे ही जी सर्वसाधारण अपेक्षा आहे ती अपेक्षाही सध्याच्या काळात पूर्ण होताना दिसत नाही.

यासंदर्भात अलीकडच्या काळात घडलेल्या अनेक गंभीर घटनांचा उल्लेख करता येईल. अगदी अलीकडे मुंबई आयआयटीमध्ये ज्या विद्यार्थ्याने आत्महत्या केली त्याचे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. साहिल वाकोडे नावाच्या विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली, त्यामागचे नेमके कारण आणि त्या विषयाची सखोल चौकशी करण्याअगोदरच त्याच्यावर चॅट जीपीटीद्वारे कॉपी केल्याचा आरोप आहे.

मुंबई आयआयटी सारख्या जगात ख्यातनाम असलेल्या या संस्थेत यवतमाळच्या या विद्यार्थ्यावर जातीय भेदभावातून जी हीन वागणूक दिली गेली त्यातूनच त्याने आत्महत्या केल्याचे बोलले जाते. या प्रकरणी अनेक विद्यार्थी संघटनांनी आंदोलन सुरू केल्यानंतर या आयआयटीचे डीन सूर्यनारायण दुल्ला यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरोधात विद्यार्थ्याला आत्महत्या करण्यास कारणीभूत झाल्याचा गुन्हाही दाखल करण्यात आला आहे.

वास्तविक विद्यार्थ्यांनी या प्रकाराला वाचा फोडली नसती आणि आंदोलन केले नसते तर एका विद्यार्थ्याची ही आत्महत्या नेमकी कशामुळे झाली हे कारण गुलदस्त्यातच राहिले असते. तिकडे वर्ध्याच्या हिंदी विद्यापीठातही गेल्या जुलै महिन्यापासून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. तेथील पीएच.डी.ची प्रवेश प्रक्रिया गेल्या चार वर्षापासून बंद करण्यात आली असून या विद्यापीठातील दोन विभागही बंद करून ते अन्यत्र हलवण्यात आले आहेत.

याच्या विरोधात गेल्या जुलै महिन्यापासून येथील विद्यार्थी आंदोलन करीत आहेत. आपल्या मागण्यांच्या संदर्भात विद्यापीठ प्रशासनाला निवेदन दिल्याच्या कारणावरून तेथील प्रशासनाने सहा संशोधक विद्यार्थ्यांना निलंबित केल्याचा प्रकारही घडला आहे. या प्रकारामुळे या विद्यापीठातील अन्य विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून त्यांनीही आंदोलनाचे हत्यार उपसले आहे, या आंदोलनाला आता कॉक्रोच जनता पार्टीने पाठिंबा दिला आहे.

ही केवळ महाराष्ट्रातीलच अगदी अलीकडची उदाहरणे नाहीत तर अन्य राज्यातही कुठे ना कुठे असेच प्रकार सुरू आहेत. भुवनेश्वरमध्ये तेथील विद्यार्थ्यांनी ओडिशाच्या शालेय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. या राज्यातील शालेय पुस्तकांमध्ये ज्या प्रचंड प्रमाणावर चुका आढळून आल्या आहेत त्या चुकांच्या विरोधात हे विद्यार्थी रस्त्यावर उतरले असून त्यांनी राज्याचे शिक्षण मंत्री नित्यानंद गोंड यांच्या राजीनाम्याची मागणी पुढे केली आहे.

या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी सत्याग्रह सुरू केला आहे. कॉक्रोच जनता पार्टी या विद्यार्थ्यांच्या आंदोलनातही उतरली आहे. केवळ विद्यापीठ किंवा महाविद्यालयीन स्तरावरच ही अस्वस्थता निर्माण झाली आहे असे नव्हे तर देशभरातल्या विविध ठिकाणच्या शालेय स्तरावरही जी अनास्था आणि अनागोंदी सुरू आहे त्याच्याही विरोधात ठिकठिकाणी शालेय विद्यार्थी सातत्याने आंदोलन करताना दिसत आहेत. या आंदोलनाचे लोण झपाट्याने पसरते आहे.

एखादे आंदोलन सुरू झाल्यावर त्याकडे गांभीर्याने पाहून त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याची भूमिका सरकारने घ्यायला हवी, पण भाजपशासित सरकारमध्ये आंदोलकांकडे साफ दुर्लक्षच करण्याची पहिल्यापासूनची प्रवृत्ती आहे. आंदोलकांना धूपच घालायची नाही, मग ते आंदोलन करून कंटाळतील आणि आपोआप आंदोलन मागे घेतले जाईल अशी सरकारची एकूण वागण्याची शैली आहे. पण शैक्षणिक क्षेत्रातील सध्या ही जी ठिकठिकाणी अस्वस्थता दिसते आहे ती कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

विविध शाळांमध्ये तसेच विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्येही पुरेसे शिक्षक नसणे, शालेय तसेच महाविद्यालयीन सोयीसुविधांचा पूर्ण अभाव असणे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे कसल्याच गांभीर्याने न बघणे, असे जे सगळे प्रकार अलीकडच्या काळात सातत्याने उघडकीला येत आहेत ते देशासाठी हितावह नाहीत.

शिक्षण घेणारी विद्यार्थ्यांची ही पिढी देशातल्या भावी नागरिकांची पिढी असून शैक्षणिक स्तरावरच त्यांचे नीट संगोपन झाले नाही तर त्यातून जे दुष्परिणाम होणार आहेत ते संपूर्ण देशाला आणि समाज व्यवस्थेला भोगावे लागणार आहेत.

त्यामुळे या क्षेत्रातल्या अस्वस्थेकडे सरकारने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे, शालेय स्तरावर किमान मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्या, शाळेच्या वर्ग खोल्या नीटनेटक्या करा अशासारख्या मागण्यांची पूर्तता करणे सरकारला अवघड जाण्याचे कारण नाही. पण या साध्या मागणीकडेही सध्या निधी उपलब्ध नसल्याचे कारण देऊन दुर्लक्ष केले जात आहे, ते कितपत योग्य आहे याचाही विचार व्हायला हवा. शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेली ही अस्वस्थता देशाचे भवितव्य अंधारात लोटणारी आहे, हे मात्र नक्की.

## देशातील कॉर्पोरेट क्षेत्र-उद्योगपती आनंदात आणि शेतकरी गंभीर संकटात

# शेतकऱ्यांनी आणखी किती दुःख सहन करावे!

सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजनांच्या घोषणा करीत असते आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखवत असते,तरीही सरकारी आकडेवारीनुसार शेतकरी आणि कार्पोरेट उद्योग यात मोठी दरी व तफावत दिसून येत असून मोठे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.त्यामुळे देशाची १४५ कोटी जनता सरकारला विचारत आहे की, कॉर्पोरेट क्षेत्र आणि कृषिप्रधान देशाचा अन्नदाता शेतकरी यांच्यात सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत यात जमीन आसमानची तफावत असा भेदाभेद का ?कारण देशाचा कर्ताधरता शेतकरी आहे आणि कॉर्पोरेट क्षेत्र शेतकऱ्यांच्या भरोशावर अवलंबून असते तरीही सरकार त्यांच्याकडे नेहमीच दुर्लक्ष करतांना दीसते. आपण २०१४ ते २०२६ या १२ वर्षात सरकारने उद्योगपती आणि कार्पोरेट क्षेत्राचे तब्बल १० लाख कोटी रुपए कर्ज माफ (राईट ऑफ) केले आहे ही माहिती राज्यसभेत सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने, तसेच वित्त मंत्रालयाने सादर केलेल्या आकडेवारीवरून ही माहिती उघडकीस आली आहे.यावरून आपण समजू शकतो की, सरकार शेतकऱ्यांच्या प्रती किती उदासीन असल्याचे दिसून येते.यामुळे कॉर्पोरेट उद्योगामध्ये आनंदाचे वातावरण दिसून येते तर,शेतकऱ्यांमध्ये सर्वत्र दुःखी आणि चिंतेचे वातावरण असल्याचे आपण पहातो. यावरून लक्षात येते की, सरकार मुठभर कॉर्पोरेट उद्योग व उद्योगपती यांच्यासाठी पाण्यासारखा पैसा कर्ज रूपात देतो आणि नंतर माफीही करतो.काही उद्योगपती तर करोडोंचे घोटाळे करून भारतातून पलायन सुध्दा करतात आणि केले सुध्दा आहे.त्याचप्रमाणे सरकार यांना सर्वतोपरी मदत सुध्दा करतात.याउलट ज्यांच्या भरोश्यावर देश चालतो,देशाची अर्थव्यवस्था चालते व १४५ कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरण्याचे काम करणाऱ्या ७० टक्के अन्नदाता शेतकऱ्यांकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.यावरून लक्षात येते की सरकार शेतकऱ्यांच्या प्रती किती मोठा भेदभाव करीत आहे ही बाब आकडेवारीवरून स्पष्ट होते. शेतकरी नेहमीच दुःखी का असतो याचा विचार सरकारने कधीच केला नाही आणि करणारही नाही असे मला वाटते.कारण कॉर्पोरेट क्षेत्रातून व उद्योगपतीकडून सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होत असतो आणि शेतकऱ्यांकडून काहीच लाभ होत नाही म्हणून सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करीत असावेत असे मला वाटते.याच कारणांमुळे आज शेतकऱ्यांचे हालबेल होत आहे.यावर्षी कोरड्या दुष्काळामुळे देशासह राज्यांतील संपूर्ण शेतकरी अंधक्कारात असल्याचे दिसून येते. कारण आज देशातील ५० टक्के शेतकऱ्यांची अत्यंत गंभीर संकटात आणि वाईट परिस्थिती असल्याचे स्पष्ट चित्र स्पष्ट दिसून येते कारण पाऊसाच्या अभावामुळे अनेक शेतकऱ्यांची पीके कापल्याने त्यांच्या शेतातून एकही दाना येण्याची शक्यता नाही.देशाचा शेतकरी हा निसर्गावर अवलंबून असल्याने पुर्वीपासूनच ओला दुष्काळ किंवा कोरडा दुष्काळाशी सामना करीत आलेला आहे.परंतू भारत हा कृषिप्रधान देश असतांना सुध्दा सरकार शेतकऱ्यांना सरळ हातांनी मदत करण्यास नेहमीच आणाकानी करीत असतात.याउलट सरकार उद्योगधंद्यांना सरळ हातांनी मदत करीत असुन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्याचे काम करीत असते.त्यामुळे पदोपदी देशाचा शेतकरी नेहमीच संकटात सापडत असतो आणि गरीबीच्या खाईत जात असल्याचे दिसून येते.ज्या पध्दतीने सरकार मदतीचा हात कार्पोरेट उद्योगांना व उद्योगपतींना देत असते त्या पध्दतीने शेतकऱ्यांना का देत नाही हा अत्यंत गंभीर व विचार करणारा प्रश्न आहे. आज राज्याच्या दृष्टीने विचार केला तर राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,मंत्री, आमदार- खासदार शेतकऱ्यांच्या बंधाऱ्यावर जाऊन पाहणी करीत आहे याचे मी मनापासून स्वागत करतो आणि दर महिन्याला शेतकऱ्यांच्या बंधाऱ्यावर संपूर्ण लोकप्रतिनिधी जाऊन तेथील आढावा सुध्दा घ्यायला हवा व त्यांच्या घरची चटणी भाकरी खायला सुध्दा पाहिजे.परंतु शेतकऱ्यांच्या मदतीचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा मिटिंग,बैठका, समिती नेमणे या भानगडीत शेतकऱ्यांच्या प्रती बिलकुल नसाव्यात.कारण राज्याच्या १४ कोटी जनतेला ग्यात आहे की,राज्याच्या शेतकऱ्यांची किती भयानक परिस्थिती आहे. मराठवाडा, विदर्भ व इतर भागात तर अत्यंत गंभीर व चिंताजनक परिस्थिती आहे आणि ही बाब सरकारला चांगल्याप्रकारे ग्यात असुन सुद्धा मदतीसाठी तारीख पे तारीख कशाला हवी एकीकडे सरकार म्हणते की मदतीपासून एकही शेतकरी वंचित रहाणार नाही मग वेळ कशाला घालवता,सरळ हातांनी मदत का करीत नाही ? ज्या पध्दतीने सरकार विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देते, योजनांसाठी ताबडतोब निधी उपलब्ध करून देते, उद्योजकांना कर्ज माफ करते त्याच धर्तीवर अन्नदाता शेतकऱ्यांना सरकारने यत्किंचितही वेळ न करता सरकारने सरळ हातांनी मदत केली पाहिजे व संपूर्ण कर्ज माफ केले पाहिजे.वेळ पडल्यास सरकारने ताबडतोब विकास कामे थांबवावित.परंतु शेतकऱ्यांच्या प्रती वेळ न करता ताबडतोब मदतीचा हात सामोर यायला हवा.सन्माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही;मग सरकार मदत करण्यासाठी वेळ का करीत आहे. आज देशातील व राज्यातील अन्नदाता शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती व गडद संकट पहाता देशातील पक्ष-विपक्षाच्या आजी-माजी आमदार- खासदार, मंत्री यांनी कमीत-कमी पाच महिन्यांचे वेतन-पेंशन शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ताबडतोब सरकारच्या तिजोरीत जमा करावे.कारण पाच महिन्यांचे पगार-पेंशन शेतकऱ्यांच्या मदतीला दिली तरी ते गरीब होणार नाही किंवा शेतकऱ्यांसारखी आत्महत्येची पाळी सुध्दा येणार नाही किंवा त्यांना कोणत्याही दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही. त्यामुळे आजी-माजी लोकप्रतिनिधींनी आतातरी तत्परता दाखवून अन्नदात्या शेतकऱ्यांना सरळ हातांनी मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा.शेतकऱ्यांना भिक नको ते आपले,देशाचे,राज्याचे अन्नदाता आहेत.अन्नदाता सुखी तर देश-राज्य नेहमीच सुजलाम सुफलाम दिसून येईल हि बाब सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.जय जवान जय किसान.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# तंजावरमध्ये पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांचा 'मराठा समाज भूषण' पुरस्काराने गौरव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** तमिळनाडूतील ऐतिहासिक नगरी तंजावरमध्ये सोलापूरचे ज्येष्ठ पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांना मानाच्या 'सरफोजीराजे भोसले मराठा समाज भूषण' पुरस्काराने गौरवण्यात आले.

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या साहित्य संमेलनात हा सन्मान सोहळा झाला. तंजावर संस्थानचे तेरावे वंशज श्रीमंत छत्रपती बाबाजीराजे भोसले यांच्या हस्ते पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




याप्रसंगी बोलताना छत्रपती बाबाजीराजे भोसले म्हणाले, पत्रकार हा समाजाला जोडणारा दुवा असतो. चव्हाण यांना दिलेला हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून मराठी आणि तमिळ या दोन संस्कृतींना जोडणारा सेतू आहे. त्यांच्या लेखणीतून तंजावरच्या मराठा इतिहासाची ओळख महाराष्ट्राच्या नव्या पिढीला होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या संमेलनाचे उदघाटन परिषदेचे राष्ट्रीय विश्वस्त ज्ञानेश्वर पतंगे यांनी दीपप्रज्वलन करून केले. ज्येष्ठ विचारवंत डॉ. शरद गोरे यांनी संमेलनाध्यक्षपद भूषविले, तर माजी मंत्री प्रा. डॉ. लक्ष्मणराव ढोबळे स्वागताध्यक्ष होते. तंजावरचे युवराज संभाजीराजे भोसले यांनी निमंत्रकाची जबाबदारी सांभाळली. श्रीमंत छत्रपती आबाजीराजे भोसले यावेळी उपस्थित होते.

केरळ प्रदेशाध्यक्षा डॉ. अश्विनी भगत, ॲड. सुधीर चव्हाण, रंजनादेवी भोइटे, शुभांगी काळभोर, रवींद्र पाटील यांच्यासह देशभरातील साहित्यिक उपस्थित होते.

पत्रकारितेबरोबरच चव्हाण यांचे सामाजिक कार्यही उल्लेखनीय आहे. सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात गरजू रुग्णांना मदत मिळवून देणे, मूळगाव शिरापूर (मोहोळ) येथे पाझर तलावासाठी पाठपुरावा करणे आणि बालाजी अमाईन्सच्या सीएसआर निधीतून गावात आधुनिक स्मशानभूमी उभारणे, या कायार्ची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम मालन यांनी केले, तर अमोल कुंभार यांनी आभार मानले.

# सततच्या वीजभारनियमनामुळे पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर पावसाची अनिश्चितता आणि पिकांना पाण्याची वाढलेली गरज असतानाच सोलापूर जिल्ह्यातील शेतीपंपांचा वीजप्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नियोजित भारनियमनाबरोबरच काही भागांत सतत अघोषित वीजखंडिती होत असल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.



अनेक भागांत वीजेच्या या लपंडावामुळे पिके हातची जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात महावितरणचे १,५०२ फीडर असून, त्यावरून सुमारे ११ लाख ३९ हजार ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. यापैकी ६७१ फीडरवर शेती आणि घरगुती ग्राहकांची जोडणी आहे. त्यातील ४७४ फीडरवर सिंगल फेज व थ्री फेजचा संयुक्त वापर होत असल्याने भार वाढला आहे. या फीडरवर आठवड्यातून आलटून-पालटून प्रत्येकी चार ते सहा तास भारनियमन केले जात आहे. त्याशिवायही अधूनमधून वीजखंडित होत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. आधीच पावसाने ओढ दिल्याने पिकांची स्थिती बिकट असताना वीजप्रश्नामुळे त्यात आणखी भर पडली आहे.

शेतीसाठी दिवसा आठ तास वीजपुरवठा करण्याचे नियोजन असले, तरी प्रत्यक्षात कमी दाब, वारंवार ट्रिपिंग आणि अचानक वीजखंडितीच्या तक्रारी आहेत. विशेषतः नदीकाठच्या आणि उजनी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी वीजपुरवठ्याची अनिश्चितता पिकांसाठी चिंतेची ठरत आहे. अनेक भागांत सिंगल फेजवर कृषीपंप जोडल्याने घरगुती फीडरवरील भार वाढतो आणि फीडर बंद पडण्याची शक्यता वाढते, असे महावितरणकडून सांगण्यात येते. मात्र, भारनियमनाचे स्पष्ट वेळापत्रक, पूर्वसूचना आणि शेतीसाठी सलग आठ तास वीजपुरवठा मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

**४७४ फीडरवर संयुक्त जोडण्या**

सोलापूर जिल्ह्यातील ६७१ फीडरवर शेती आणि घरगुती ग्राहकांची जोडणी आहे. त्यापैकी ४७४ फीडरवर सिंगल फेज आणि थ्री फेजचा संयुक्त वापर होत असल्याने वीजभार वाढत आहे. परिणामी या फीडरवर आठवड्यातून आलटून-पालटून चार ते सहा तास भारनियमन केले जात आहे. त्यातच अचानक वीजखंडिती होत असल्याने शेतकऱ्यांच्या सिंचनाचे नियोजन विस्कळीत होत आहे.

पान १ वरून

## दुष्काळी परिस्थितीत अधिकारी...

तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या पूर्वपरवानगीनेच घेता येणार आहे.

**रजेचा अर्ज थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे**

कोणत्याही अधिकाऱ्याने परस्पर अथवा आपल्या मूळ प्रशासकीय प्रमुखाकडून परस्पर रजा मंजूर करून घेऊन मुख्यालयातून गैरहजर राहू नये. रजेचा अर्ज संबंधित कारणांसह व विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा. जिल्हाधिकारी कार्यालयाची लेखी पूर्वपरवानगी मिळाल्याशिवाय कोणालाही रजेवर जाता येणार नाही.

**विनापरवानगी गैरहजेरीस कडक कारवाई**

जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय रजेवर जाणे अथवा मुख्यालयात अनुपस्थित आढळल्यास संबंधित जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांवर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल. यामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 अन्वये शिस्तभंगाची कारवाई तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील संबंधित तरतुदींनुसार फौजदारी कारवाईचा समावेश आहे.

**शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणींचा तातडीने निपटारा-**

दुष्काळग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणी संवेदनशीलतेने ऐकून त्यांचा तातडीने निपटारा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. कामातील कोणतीही कुचराई, दुर्लक्ष अथवा गैरहजेरी ही आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा भंग मानली जाईल, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

**संपर्क व्यवस्था अद्ययावत ठेवण्याचे निर्देश**

सर्व विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्त क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवावेत. आपत्कालीन परिस्थितीत संपर्क तात्काळ व प्रभावीपणे होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची संपर्क यादी जिल्हा कार्यालयास सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या आदेशाची अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागप्रमुख व क्षेत्रीय अधिकाऱ्यांची राहणार असून आदेशाच्या अंमलबजावणीत कसूर झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल, असे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

## परीक्षेची अट नाही, ना ट्रेनिंग...

"अग्निवीरांची पहिली बॅच ही आता त्यांचा कार्यकाळ संपवून परत येणार आहे. आपल्याला कल्पना आहे की, केंद्र सरकारने निर्णय घेतला होता की, अग्निवीरांच्या बॅचमधील अग्निवीर चार वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर 25 टक्के अग्निवीर हे सेवेतच राहतील आणि 75 टक्के अग्निवीर हे केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या विविध फोर्सेसमध्ये घेतले गेले पाहिजेत. महाराष्ट्राने हा निर्णय केलेला आहे की, पोलीस किंवा तत्सम आपल्याकडे वेगवेगळे पदं आहेत, त्या सगळ्या पदांवर आपण या अग्निवीरांना सामावून घेणार आहोत", अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

**परीक्षेची अट नाही, चार वर्षांच्या वयाची सूट**

"त्यांच्याकरता कुठलीही परीक्षेची अट असणार नाही. ट्रेनिंगची अट असणार नाही. कारण ते आधीच परीक्षा देऊन आणि ट्रेनिंग घेऊन आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी कुठलीही अट असणार नाही. खरं म्हणजे ते अतिशय तरुण आहेत. पण तरीही त्यांना चार वर्षांची सूट आपण वयात देणार आहोत. सगळ्या प्रकारची सूट देणार आहोत", अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**'पद कमी पडले तर वाढवू, पण सर्वांना सामावून घेऊ'**

"समजा ते फायरमन म्हणून गेले तर त्यांना तीन महिन्यांची ट्रेनिंग एका वर्षात घ्यावं अशा पद्धतीचं बंधन टाकणार आहोत आणि तिथे सामावून घेणार आहोत. कुठे पदं कमी पडली तर अधिसंख्य पदं निर्माण करण्याचा निर्णय देखील ठरवलेला आहे. जेणेकरुन जेवढे अग्निवीर शासनामध्ये येऊ इच्छित आहेत त्या सर्वांना सामावून घेणार आहोत", अशीदेखील माहिती फडणवीसांनी दिली.

**'कोस्टल सेक्युरिटीमध्ये सामावून घेऊ'**

"विशेषतः नेव्हीमधून जे अग्निवीर आपल्याकडे येत आहेत, आपल्याला आज कोस्टल सेक्युरिटीमध्ये त्यांची आवश्यकता आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून पदांच्या संख्यांची शिथिलता करुन त्यातील जेवढे अग्निवीर आपल्याकडे येतील त्यांना आपण कोस्टल सेक्युरिटीमध्ये समाविष्ट करुन घेण्याचा निर्णय घेतलेला आहे", असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**'ज्यांची इच्छा त्यांना शासनात सामावून घेऊ'**

"स्पेशल आपण दहा टक्क्यांचं आरक्षण अग्निवीरांना दिलंच आहे. माजी सैनिक कॅटेगिरीत मोठ्या प्रमाणात आपली पदं रिक्त राहतात. त्यावरही आपण अग्निवीरांना प्राधान्य देणार आहोत. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात जे अग्निवीर परत येतील, त्यातील ज्या-ज्या लोकांना शासनात काम करण्याची इच्छा आहे, त्यांचा अनुभवाचा फायदा राज्य सरकार घेईल. त्या सगळ्या अग्निवीरांना आम्ही राज्य सरकारमध्ये सामावून घेऊ", अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करा- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला. अपूर्ण असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. काटकर, वरिष्ठ भूवैज्ञानिक मुस्ताक शेख तसेच सर्व तालुक्यांतील पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध पाणीपुरवठा योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सविस्तर आढावा घेतला. जल जीवन मिशनमधील निविदा चौकशी समितीच्या आक्षेपांमुळे 189 कामांची देयके प्रलंबित असल्याबाबतही यावेळी माहिती घेण्यात आली.

सांगोला, अक्कलकोट व बार्शी तालुक्यांतील अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची तपशीलवार माहिती घेऊन या योजना पूर्ण न होण्यामागील कारणांचा जिल्हाधिकारी यांनी आढावा घेतला. संबंधित ठेकेदारांना कामाची रक्कम देण्याबाबत पालकमंत्र्यांशी विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

पाणीपुरवठा योजनांसाठी जागा उपलब्ध करून द्यावी

जल जीवन मिशनच्या कामांसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी. अपूर्ण पाणीपुरवठा योजनांमध्ये अनेक ठिकाणी विहीर व पाण्याच्या टाकीसाठी ग्रामपंचायतींकडून आवश्यक जागा उपलब्ध करून दिली जात नसल्याचे आढळून आले आहे. ज्या ग्रामपंचायती पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देत नाहीत, त्यांच्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबतचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तातडीने सादर करावेत, असेही त्यांनी सांगितले.

**थकबाकीमुळे बंद योजना सुरू करण्यासाठी निधी उपलब्ध करा**

महावितरणाच्या थकबाकीमुळे ज्या पाणीपुरवठा योजना बंद आहेत, त्याबाबत आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन या योजना सुरू करण्यासाठी कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

शिरभावी पाणीपुरवठा योजनेचा आढावा

सांगोला तालुक्यातील 82 गावांसाठी असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या शिरभावी पाणीपुरवठा योजनेचाही यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. योजनेची सद्यस्थिती, प्रलंबित कामे तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.

## वात्रटिका

### जुळवाजुळव

विषय गंभीर आहे,चला
एकत्र येऊन चांगला कांडू...
लोक बघतात आपल्याकडे
आडबाजूला जाऊन भांडू...
एकत्र येऊ,आवाज उठवू
दणक्यात काढू मोर्चा...
आघाडी घेऊ बिघाडी न होता
पण सगळीकडे त्याचीच चर्चा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

## जागतिक पर्यटन दिनानिमित्त भालेवाडी येथे अभ्यास दौरा यशस्वी



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जागतिक पर्यटन दिनानिमित्त आयोजित सोलापूर पर्यटन सप्ताहाच्या अनुषंगाने दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी 'मध, कृषी व ग्रामीण पर्यटन शेतकरी समिती, कोळे' (ता. सांगोला) यांच्या वतीने एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प व जिल्हा नियोजन समिती अंतर्गत विकसित होत असलेल्या 'मिल्क अँड मिलेट व्हिलेज, भालेवाडी' (ता. मंगळवेढा) येथे अभ्यासात्मक पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास प्रायमुव्ह, पुणे यांचे तांत्रिक सहाय्य लाभत आहे.

ग्रामीण व कृषी पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासोबतच विविध गावांमध्ये विकसित होत असलेल्या पर्यटन संकल्पनांचा अभ्यास करून त्या आपल्या गावात राबविण्याच्या उद्देशाने हा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला.

या दौऱ्यात सहभागी प्रतिनिधींनी भालेवाडी येथील आदर्श गोठे, ऐतिहासिक मामाचा वाडा, धार्मिक व ऐतिहासिक स्थळे, पुरातन आड, जिल्हा परिषद शाळा, सेंद्रिय परसबागा, देशी वृक्षांची रोपवाटिका, पर्यटन पायाभूत सुविधांची कामे तसेच ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेली आदर्श स्मशानभूमी यांची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी भालेवाडी पर्यटन समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत दवले, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय गायकवाड, पर्यटन मार्गदर्शक नानासाहेब रोंगे तसेच पर्यटन समितीचे सदस्य उपस्थित होते. त्यांनी भालेवाडीमध्ये राबविण्यात येत असलेल्या विविध पर्यटन उपक्रमांची माहिती सहभागी प्रतिनिधींना दिली.

पाहणी दौऱ्यानंतर स्थानिक शेतकरी, पर्यटन समितीचे सदस्य व महिला बचत गटांच्या प्रतिनिधींशी संवाद साधण्यात आला. यावेळी कृषी, दुग्ध व्यवसाय, भरडधान्य उत्पादन, स्थानिक संस्कृती व ग्रामीण पर्यटनाची सांगड घालून शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

भालेवाडी येथे विकसित होत असलेल्या विविध पर्यटन उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील स्थानिक संसाधनांना पर्यटनाशी जोडण्याची प्रभावी संधी निर्माण झाली असून, कोळे गावात मध उत्पादन, कृषी व स्थानिक ऐतिहासिक वारशाची सांगड घालून ग्रामीण पर्यटन विकसित करण्यासाठी हा अभ्यास दौरा अत्यंत मार्गदर्शक ठरेल, असे मत कोळे येथील पर्यटन समितीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्ह्यात एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्पाच्या माध्यमातून विविध 'थीम बेस्ड पर्यटन गावे' विकसित करण्याच्या उपक्रमाला अशा अभ्यास दौऱ्यांमुळे चालना मिळत असून, गावागावातील स्थानिक वैशिष्ट्ये पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार व शाश्वत विकासाशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## सोलापूर जिल्ह्यात उत्पादित चारा जिल्ह्याबाहेर वाहतूक करण्यास बंदी



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून जिल्ह्यातील पशुधनासाठी चारा उपलब्ध राहावा, यासाठी जिल्ह्यात उत्पादित होणारा सर्व प्रकारचा चारा व मुरघास जिल्ह्याबाहेर किंवा अन्य राज्यात वाहतूक करून विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर एस. कार्तिकेयन यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 मधील कलम 144 अन्वये हा आदेश जारी केला आहे.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या एकत्रित माहितीनुसार, सोलापूर जिल्ह्यातील पशुधनास अंदाजे पुढील 120 दिवस म्हणजे डिसेंबर 2026 अखेरपर्यंत पुरेल इतका चारा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, जिल्ह्यात उत्पादित होणारा चारा व मुरघास इतर जिल्ह्यांत किंवा राज्यांत वाहतूक करून विक्री झाल्यास जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कमी होऊन चारा टंचाई व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

### जून 2027 अखेर पर्यंत आदेश लागू

सदर आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यात उत्पादित होणारा सर्व प्रकारचा चारा व मुरघास इतर जिल्ह्यात किंवा राज्यात वाहतूक करण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून जून 2027 अखेरपर्यंत लागू राहणार आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील संबंधित प्रशासकीय, पोलीस, कृषी, पशुसंवर्धन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यंत्रणांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम राहावी आणि संभाव्य चारा टंचाई टाळता यावी, या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने हा प्रतिबंधात्मक निर्णय घेतला आहे.

## अकलूजमध्ये रंगणार 'उद्योग महर्षी चषक' निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** उद्योग महर्षी उदयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ अकलूज येथे 'उद्योग महर्षी चषक' राष्ट्रीय निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. उदयसिंह क्रीडा मंडळ, अकलूज यांच्या वतीने आयोजित ही स्पर्धा २ ते ४ ऑक्टोबर २०२६ दरम्यान विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे पार पडणार असल्याची माहिती शिवरत्न उद्योग समूहाचे चेअरमन कीर्तीध्वजसिंह मोहिते पाटील व उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी दिली.

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. याप्रसंगी शिवशंकर मध्यवर्ती सहकारी बझारच्या चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी




मोहिते-पाटील, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील तसेच जिल्हा परिषद सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांच्यासह राजकीय व क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत प्रयागराज, बंगळुरू, कर्नाटक, नांदेड, नागपूर, मुंबई, पुणे, बीड यांसह देशाच्या विविध भागांतील १६ नामांकित संघ सहभागी होत असून, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर आपल्या खेळाचा ठसा उमटवलेले नामांकित खेळाडू कोर्टवर उतरणार आहेत. स्पर्धेतील सामने दररोज दोन सत्रांत म्हणजेच सकाळच्या सत्रात सकाळी ७:०० ते दुपारी १२:०० आणि दुपारच्या सत्रात दुपारी ३:०० ते रात्री १०:०० या वेळेत खेळवले जातील.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी भरघोस रोख पारितोषिके ठेवण्यात आली असून, प्रथम क्रमांकास ₹७१,००१ व ट्रॉफी, द्वितीय क्रमांकास ₹५१,००१ व ट्रॉफी, तृतीय क्रमांकास ₹३१,००१ व ट्रॉफी, चतुर्थ क्रमांकास ₹२१,००१ व ट्रॉफी, तसेच उत्कृष्ट खेळाडूसाठी ₹५,००१ रोख व ट्रॉफी देऊन गौरवण्यात येणार आहे. स्पर्धेचा भव्य बक्षीस वितरण समारंभ रविवार, ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७:०० वाजता होणार आहे. क्रीडारसिकांनी या रोमहर्षक सामन्यांचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष कीर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील आणि कार्याध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी केले आहे.

## हृदय शस्त्रक्रियेसाठी १९ बालक मुंबईकडे रवाना

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सेवा संकल्प अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम आणि जिल्हा शीघ्र हस्तक्षेप निदान व उपचार केंद्र (DEIC), जिल्हा रुग्णालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हृदय शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या १९ बालकांना विशेष बसद्वारे बालाजी रुग्णालय, मुंबई येथे आज दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी उपचारासाठी रवाना करण्यात आले.

या विशेष बसला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी हिरवा झेंडा दाखवून बालकांना मुंबईकडे रवाना केले.



**बालकांच्या निरोगी भविष्यासाठी आरोग्य विभागाचा सेवासंकल्प**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या माध्यमातून लवकर निदान, वेळेवर उपचार आणि आवश्यक शस्त्रक्रिया उपलब्ध करून देत बालकांना निरोगी जीवनाची संधी देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत १९ बालकांना हृदय शस्त्रक्रियेसाठी मुंबईकडे रवाना करण्यात आल्याने त्यांच्या निरोगी भविष्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

सेवा संकल्प अभियान
'बाल आरोग्याची काळजी — निरोगी भविष्याची हमी!'

### १९ बालकांवर होणार मोफत हृदय शस्त्रक्रिया

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील हृदयरोग असलेल्या व शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या बालकांची तपासणी करून त्यांची उपचारासाठी निवड करण्यात आली आहे.

शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या बालकांच्या पालकांना शिबिराच्या पंधरा दिवस अगोदर पूर्वसूचना देण्यात आली. तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात आली असून, मुंबई येथे होणाऱ्या मोफत हृदय शस्त्रक्रिया शिबिराबाबत पालकांचे समुपदेशन करण्यात आले.

या उपचारासाठी प्रत्येक बालकासोबत दोन पालकांना पाठविण्यात आले असून, एकूण १९ बालकांना विशेष बसद्वारे मुंबईकडे रवाना करण्यात आले आहे. बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बससोबत वैद्यकीय पथकाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

### प्रवास, निवास व भोजनाची सुविधा पूर्णपणे मोफत

बालक व त्यांच्या पालकांसाठी मुंबई येथील उपचारादरम्यान ये-जा करण्याचा प्रवास, निवास, नाश्ता, भोजन तसेच आवश्यक वैद्यकीय सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील बालकांना कोणताही आर्थिक भार न पडता आवश्यक हृदय शस्त्रक्रियेची सुविधा मिळणार आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती

या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चंद्रकांत क्षीरसागर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. इरफान सय्यद, मेट्रन श्रीमती विजयमाला बेले तसेच जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम आणि जिल्हा शीघ्र हस्तक्षेप निदान व उपचार केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### सोलापूर जिल्ह्यात आतापर्यंत २,००३ हृदय शस्त्रक्रिया; विविध आजारांच्या ११,८६० शस्त्रक्रिया मोफत

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यात बालकांच्या आरोग्याचे संवर्धन व विकास साधण्यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

आजपर्यंत जिल्ह्यात २,००३ बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया तसेच विविध आजारांसाठी ११,८६० शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. यातील बहुतांश बालकांचा संबंध गरीब व कष्टकरी कुटुंबांशी असल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्या शस्त्रक्रियांसाठी साधारणतः रु. १०,००० ते रु. ८,००,००० पर्यंत खर्च अपेक्षित असतो, अशा शस्त्रक्रिया पात्र बाल लाभार्थ्यांसाठी मोफत करण्यात आल्या आहेत.

याशिवाय किरकोळ आजार असलेल्या असंख्य बालकांना तपासणीच्या ठिकाणीच आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळे आजारांचे वेळेवर निदान व उपचार होऊन संभाव्य आरोग्यविषयक गुंतागुंत आणि धोके टाळण्यास मदत झाली आहे, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी दिली.

## अनगरच्या लेकींच्या संघाची राज्यस्तरीय रग्बी स्पर्धेसाठी निवड



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने शारदेय गुरुकुल, टेंभुर्णी येथे झालेल्या सोलापूर, पुणे व अहिल्यानगर विभागीय रग्बी स्पर्धेत कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अनगरच्या १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत विभागीय विजेतेपद पटकावले. या कामगिरीमुळे अनगरच्या लेकींच्या संघाची राज्यस्तरीय रग्बी स्पधेर्साठी निवड झाली आहे.

स्पधेर्तील पहिल्या सामन्यात अनगरच्या संघाला पुढे चाल मिळाली. त्यानंतर पिंपरी-चिंचवड संघावर ३-० अशी मात करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात पुणे शहर संघाचा ३-० असा पराभव करून अनगरच्या संघाने विभागीय विजेतेपद मिळवले. आता हा संघ रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रग्बी स्पर्धेत सहभागी होणार आहे.

या विजयी संघात श्रावंती शंकर बिस्वास, ईश्वरी जयराम शिंदे, प्रणिती सुनील रणदिवे, श्रावणी रणजीत थिटे, समृद्धी महादेव कापसे, संजीवनी दादाराव थिटे, मानसी तुळसीदास गरगडे, कशिश जयकुमार शिंगटे, श्रुती मारुती करंडे, ऋतुजा दत्तात्रय शिंदे, वैभवी मारुती वराळे व प्रियंका सोमनाथ लोंढे यांचा समावेश आहे.

या खेळाडूंना क्रीडाशिक्षक दाजी गुंड, रवींद्र बोडके, चंद्रकांत सरक, हरिदास शिंदे, पंढरी थिटे, अर्चना गुंड व विलास गुंड यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी खेळाडू व मार्गदर्शकांचे राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, लोकनेते बाबुराव पाटील साखर कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील, अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले, प्राचार्य डॉक्टर चंद्रकांत सूर्यवंशी प्राचार्य महादेव चोपडे, मुख्याध्यापक रामचंद्र पाटील मुख्याध्यापक संजय डोंगरे उपप्राचार्य माधव खरात व पर्यवेक्षक राजेंद्र डोके यांनी अभिनंदन केले.

## 'ईच्छा भगवंताची' नवरात्र मंडळाच्या सरावाला उत्साहात प्रारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'ईच्छा भगवंताची' नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी सायंकाळी लेझीम सरावाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांच्या हस्ते लेझीम व वाद्यांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर फटाक्यांची आतषबाजी आणि भक्तिमय वातावरणात लेझीम सरावाला सुरुवात झाली यावेळी मंडळाचे मार्गदर्शक ॲड. अनिल जाधव, भाजपा नगरसेवक किसन जाधव, माजी नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड, युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड, अजिंक्य जाधव, करण जाधव, उत्कर्ष गायकवाड, प्रथमेश गायकवाड, तेजस गायकवाड, तुषार गायकवाड, मोहित गायकवाड, कार्तिक जाधव यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लक्ष्मण मामा जाधव म्हणाले, लेझीम हा केवळ पारंपरिक खेळ नाही, तर तो शिस्त, एकजूट, संस्कार आणि संघटनाची शिकवण देणारे माध्यम आहे. आजच्या युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आपल्या संस्कृतीशी आणि परंपरेशी जोडले जावे, हा 'ईच्छा भगवंताची' परिवाराचा सातत्याने प्रयत्न आहे. नवरात्र महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना एकत्र आणत सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्याचे कार्य आम्ही करत आहोत. भाजपा नगरसेवक किसन जाधव यांनी सांगितले, शेकडो नव्हे तर सुमारे एक हजार युवकांना एकत्रित करून त्यांच्यामध्ये शिस्त आणि संघटनेची भावना निर्माण करण्याचे सामर्थ्य केवळ लक्ष्मण मामा जाधव यांच्या नेतृत्वामुळे शक्य झाले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली युवक मोठ्या उत्साहाने सहभागी होत असून, व्यसनांपासून दूर राहण्याचा सकारात्मक संदेश समाजात पोहोचत आहे. ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाची लेझीम पथकाची शिस्तबद्ध मिरवणूक सोलापूर शहरात विशेष परिचित आहे. यंदाच्या वर्षी उत्सव अध्यक्ष म्हणून अंबादास जाधव यांची निवड झाली असून घटस्थापना दिवशी शक्तिदेवीच्या प्राणप्रतिष्ठापना निमित्त निघणाऱ्या मिरवणुकीत शेकडो युवक लेझीम व पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून आपली कला सादर करतात. महाराष्ट्राची आराध्य व कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या चरणी नतमस्तक होत भक्तिभाव, शिस्त आणि उत्साहाने होणारा हा सराव नवरात्रोत्सवाचे आकर्षण ठरत आहे. युवकांना संस्कृतीशी जोडण्याबरोबरच त्यांच्यात सामाजिक जाणीव, शिस्त आणि संघटन निर्माण करण्यासाठी 'ईच्छा भगवंताची' परिवाराचे हे कार्य उल्लेखनीय ठरत असून, लक्ष्मण मामा जाधव यांच्या नेतृत्वाखाली हजारो युवकांना एकत्र आणण्याचा हा उपक्रम सोलापूरच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात लक्षवेधी ठरत आहे.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सतत कार्यरत राहणारा एक छोटा जीव २) एक उपदिशा ३) रात्रीच्या वेळचे जेवण (इंग्रजीत) ४) हिंदी चित्रपट निर्माता-** चोप्रा ५) इंदिरा गांधींच्या आईचे नाव-*** नेहरू ६) भीती (हिंदीत) ७) पोस्ट, पत्र ९) नव्वदच्या दशकातील हिंदी चित्रपटातील अभिनेत्री १०) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** ११) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो १२) संशय (हिंदीत) १३) मंत्र्यांच्या नावापुढे येणारे विशेषण १४) शक्तीमान, ताकद असलेला १५) वृक्षाच्या मुळ्या आणि फांद्या यांच्यामधील भाग १८) चिंच (हिंदीत) २०) क्रिकेट स्पर्धेसाठी वापरला जाणारा चेंडू-*** बॉल २१) महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर २५) नक्कल करणारा २७) एक म्हण-****** अक्कल नसते २८) श्रीरामाचा एक बंधू ३०) ख्रिश्चन धर्मसेविका ३२) नजीक, समीप ३४) हा चिरताना डोळ्यात पाणी येते ३५) यशाचे सूत्र, गुपित ३६) देवाचे चिंतन, नमस्कार ३७) पध्दत, रीत (हिंदीत) ३९) हिंदी न्यूज चॅनेल-** तक ४१) क्षण (हिंदीत) ४२) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात

**आडवे शब्द :** १) रिलायन्सचा आयपीएलमधील संघ ५) चवीला कडू असे ८) शन उलट लिहा ९) वय (हिंदीत)
१०) प्रतिष्ठीत, सन्माननीय १२) जुन्या हिंदी चित्रपटातील एक अभिनेत्री-*** टागोर
१३) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पत्र्याची पट्टी १४) दह्यात पाणी मिसळून बनविलेले पेय १५) सर्दी बरोबर हा येतो
१६) बशीचा जोडीदार १७) क्रिकेटमध्ये गोलंदाजाने बाहेरच्या बाजूस टाकलेला चेंडू, रूंद (इंग्रजीत) १९) तहसीलदार
२१) शपथ (हिंदीत)
२२) वस्तूचे मूल्य, भाव २३) गोधडी २४) मग्न, एकरूप
२६) टेकडी (हिंदीत) २९) मुलाची पत्नी, स्नुषा
३१) लाकूड कापताना होणारा आवाज ३२) जीभ, दिलेला शब्द (हिंदीत)
३३) एक दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेता ३५) गाणे गाणारा, गायक
३६) होकारच्या विरूध्दार्थी ३८) कपड्यावरील कचरा घाण
३९) आंब्याचा रस ४०) त्रास, फल्यू (मराठीत)
४३) सलमान, संजय दत्त आणि माधुरी दीक्षित अभिनीत एक चित्रपट
४४) मुंबईतील हा गणपती प्रसिध्द आहे-**** चा राजा

## सुडोकु - 66

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 7 | 5 | | | 6 | | 3 |
| 4 | 3 | | | | 6 | | | 5 |
| 6 | | 8 | 1 | | 9 | | 2 | 7 |
| 2 | | 6 | 4 | 5 | | | | |
| | | 1 | | 6 | | 3 | 4 | |
| 7 | | | | | 8 | | 5 | |
| 8 | | | 7 | | | 1 | 3 | |
| | 7 | 4 | | 2 | | 5 | 9 | |
| 1 | | 9 | 3 | | 5 | | | |

# ४ ऑक्टोबरला बेळगाव येथे त्रि-सेवा माजी सैनिक मेळावा व रोजगार मेळावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यालय दक्षिण भारत एरिया यांच्या अंतर्गत दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शिवाजी स्टेडियम, दि मराठा लाइट इन्फेंट्री रेजिमेंटल सेंटर, बेळगाव येथे त्रि-सेवा माजी सैनिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात माजी सैनिकांना सेवा व पेन्शनशी संबंधित तक्रारींबाबत मार्गदर्शन तसेच आवश्यक स्पष्टीकरण देण्यात येणार आहे. माजी सैनिकांच्या सोयीसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर, विविध रेजिमेंट्स व सेवांचे स्वतंत्र काउंटर, ईसीएचएस (ECHS) सुविधा, स्पर्श (SPARSH) व आधार अद्ययावत करण्याची सुविधा तसेच बँक काउंटर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

माजी सैनिक, वीर नारी व अवलंबितांसाठी रोजगाराच्या संधी

त्रि-सेवा माजी सैनिक मेळाव्याच्या अनुषंगाने रोजगार मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार असून, इच्छुक उमेदवारांच्या थेट मुलाखती (Walk-in Interviews) घेण्यात येणार आहेत.

इच्छुक माजी सैनिक, वीर नारी तसेच त्यांच्या अवलंबितांनी रोजगार मेळाव्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या ई-रजिस्ट्रेशन लिंकद्वारे पूर्वनोंदणी करावी. तसेच ई-रजिस्ट्रेशन लिंकवर नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर आपला बायोडाटा (Resume/CV) पाठवावा. सहभागी होणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, उपलब्ध रोजगाराच्या संधी आणि संबंधित प्रतिनिधींची माहिती नंतर जाहीर करण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील पात्र माजी सैनिक, वीर नारी व त्यांच्या अवलंबितांनी या त्रि-सेवा माजी सैनिक मेळावा व रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# अक्षय भांड यांच्या वतीने फलक; मोहिते-पाटील यांच्या टीकेनंतर राजकीय चर्चांना उधाण

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून सुरू असलेल्या राजकीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर माळशिरस तालुक्यात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समर्थनार्थ बॅनरबाजी करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अक्षय भांड यांच्या वतीने लावण्यात आलेल्या या फलकांवर जयकुमार गोरे यांना 'सक्षम पालकमंत्री' तसेच 'सोलापूर जिल्ह्याला हवे असलेले सक्षम आणि धडाडीचे नेतृत्व; अशा आशयाचे संदेश देण्यात आले आहेत.




माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी अलीकडेच सोलापूर जिल्ह्यासाठी चांगला व शेतीची जाण असलेला तसेच जिल्ह्याला वेळ देणारा पालकमंत्री मिळावा, अशी मागणी केली होती. त्यानंतर माळशिरसमध्ये गोरे यांच्या समर्थनार्थ झळकलेल्या या फलकांकडे राजकीय शक्तिप्रदर्शन म्हणून पाहिले जात आहे.

फलकांमधून पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला असून, त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात विकासकामांना गती मिळाल्याचा दावा समर्थकांकडून करण्यात आला आहे. दुसरीकडे, गोरे आणि मोहिते-पाटील यांच्यात गेल्या काही दिवसांपासून विविध मुद्द्यांवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामुळे माळशिरस तालुक्यातील ही बॅनरबाजी चर्चेचा विषय ठरली आहे.

'जयकुमार भाऊ गोरे ठरले सक्षम पालकमंत्री' आणि 'सोलापूर जिल्ह्याला हवेय सक्षम आणि धडाडीचे नेतृत्व' अशा आशयाचे फलक तालुक्यात लक्ष वेधून घेत आहेत. या फलकांमुळे आगामी काळात माळशिरसच्या राजकीय वातावरणात आणखी हालचाली वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, स्थानिक राजकीय वर्तुळात या बॅनरबाजीची जोरदार चर्चा सुरू आहे.

# नालबंदवाडीत ९ वर्षीय आयुष थिटेच्या अवयवदानातून गरजू रुग्णांना जीवदान

## आयुषच्या कुटुंबीयांनी माणुसकीचा केला आदर्श निर्माण

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील नालबंदवाडी येथील आयुष महेश थिटे (वय ९) या चिमुकल्याचा अपघाती मृत्यू झाला.या दुःखद प्रसंगी आई-वडिलांसह चुलते विष्णू थिटे यांनी अवयवदानाचा निर्णय घेत सामाजिक बांधिलकी जपत गरजू रुग्णांना जीवदान देण्याचे मोलाचे कार्य केले.



मोहोळ तालुक्यातील नालबंदवाडी येथे दि.२३ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास आयुष हा घरासमोर सायकल खेळत असताना चारचाकी वाहनाची त्याला धडक बसली. या अपघातात त्याच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली.त्याला उपचारासाठी सोलापूर येथील सीएनएस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.मात्र डोक्याला झालेली गंभीर दुखापत आणि मेंदू निकामी झाल्याने उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.आयुषचे ब्रेन डेड झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केल्यानंतर कुटुंबीयांसमोर मोठे दुःख असतानाही आई-वडील व चुलते विष्णू थिटे यांनी अवयवदानाचा निर्णय घेतला.त्यानुसार आयुषचे हृदय, दोन्ही किडनी, डोळे, लिव्हर हे अवयव दान करण्यात आले. मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी आयुषचे हृदय विशेष विमानाने सोलापूर विमानतळावरून चेन्नई येथे नेण्यात आले. तर किडनी, डोळे, लिव्हर हे अवयव पुणे येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. एका नऊ वर्षीय चिमुकल्याच्या दुर्दैवी मृत्यूचे दुःख सहन करताना कुटुंबीयांनी घेतलेल्या अवयवदानाच्या निर्णयामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. या दुःखाच्या प्रसंगीही अवयवदानाचा निर्णय घेत आयुषच्या कुटुंबीयांनी माणुसकीचा आदर्श निर्माण केला आहे.

# क्रांतिसूर्य स्व. अण्णासाहेब पाटील यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माथाडी कामगारांचे दैवत क्रांतिसूर्य स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या पंढरपूरच्या उपकेंद्र कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या समाजहितासाठीच्या कायार्ला व संघर्षमय जीवनाला उजाळा देण्यात आला. युवकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख करून त्यांच्या विचारांचा व कार्याचा आदर्श घेऊन समाजातील युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संकल्प करण्यात आला.

तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध कल्याणकारी व स्वयंरोजगार योजनांविषयी जिल्हा समन्वयक सौरभ मगर यांनी यावेळी माहिती दिली. तर अण्णासाहेब पाटील यांनी कष्टकरी माथाडी कामगारांना संघटित करून त्यांना समाजात हक्क आणि सन्मान मिळवून दिला. केवळ कामगारांचेच नव्हे, तर मराठा समाजातील आणि सर्वसामान्य कुटुंबातील तरुणांनी स्वयंरोजगाराच्या माध्यमातून उद्योजक बनावे, ही त्यांची दूरदृष्टी होती. अण्णासाहेबांची ही चळवळ आणि विचार आजही लाखो तरुणांना स्वावलंबी बनण्यासाठी प्रेरणा देतात. असे अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण यांनी सांगितले

यावेळी अमोल पवार, अजित पवार, सुभाष कडलासकर, शिवचरण जाधव, मनोज गांगधरी, गौतम जाधव, शरद जाधव, रमेश पवार, सागर बागल, राजेंद्र चव्हाण, प्रशांत चव्हाण, सौ. अर्चना ताई चव्हाण, सतीश कदम, राहुल मच्छिंद्र सावंत, ओंकार खराडे, अजित पाटील, ज्ञानेश्वर बाबर, रमेश मोरे, प्रकाश गाजरे, सोमनाथ गाजरे, गणेश जाधव, शिवाजी मोरे, सोमनाथ झेंड, सचिन गंगथडे, नानासाहेब शिंदे, काका यादव, नागेश गायकवाड, हनुमंत कदम, प्रमोद कोडग, शुभम ताटे देशमुख, कृष्णा ढोकळे यांच्यासह अनेक लाभार्थी, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज, दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जयकुमारजी पाटील उद्योग भवन, चिंचोळी एम.आय. डी.सी. येथे उत्साहात पार पडली.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस असोसिएशनच्या १७ नवीन सभासदांचे स्वागत असोसिएशनचे अध्यक्ष राम रेड्डी तर्फे करण्यात आले. तसेच एम.आय.डी.सी.चे प्रादेशिक अधिकारी शिवाजी राठोड, उपअभियंता प्रदीप खंदारे, फायर ब्रिगेडचे उपअधिकारी रमेश शिंदे आणि महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती माशाळ यांचेही स्वागत करण्यात आले.

असोसिएशनचे सचिव वासुदेव बंग यांनी प्रास्ताविकातून गेल्या वर्षभरात असोसिएशनमार्फत करण्यात आलेल्या विविध कामांचा व उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी असोसिएट सभासदांची व्याख्या, त्यांचे हक्क व मर्यादा याबाबत सभासदांना सविस्तर माहिती दिली. एकूण प्रिन्सिपल सभासदांच्या तुलनेत असोसिएट सभासदांची संख्या जास्तीत जास्त १० टक्के ठेवण्याचा ठराव सभासदांच्या संमतीने मंजूर करण्यात आला.

तसेच सेकंडरी(दुय्यम) सभासदांची व्याख्या, असोसिएशनकडून साहाय्य मिळविण्यासाठी त्यांची पात्रता व लागू असलेल्या अटी याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. यासंदर्भातील ठराव सभासदांच्या संमतीने मंजूर करण्यात आला.

यापुढे कार्यकारी समितीच्या सदस्यांनी कार्यकारी सदस्य म्हणून कायम राहण्यासाठी त्यांच्या तीन वर्षांच्या कार्यकाळात कार्यकारी समितीच्या बैठकींमध्ये किमान ५० टक्के उपस्थिती नोंदविणे अनिवार्य करण्याचा ठराव ही पारीत करण्यात आला. हि अट पूर्ण न करणारे सदस्य आगामी निवडणुकीत कार्यकारी समितीच्या सदस्यपदासाठी उमेदवारी भरण्यास पात्र राहणार नाहीत, असा ठरावही सभेत मंजूर करण्यात आला.

असोसिएशनचे खजिनदार सप्रेम कोठारी यांनी वार्षिक आर्थिक हिशोबांचे सादरीकरण केले. तसेच आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी असोसिएशनचे चार्टर्ड अकाउंटंट म्हणून धनराज नोगजा यांची नियुक्ती सवार्नुमते मंजूर करण्यात आली. असोसिएशनच्या नवीन इमारतीसाठी देणगी देणाऱ्या सर्व सभासदांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

अध्यक्षीय भाषणात असोसिएशनचे अध्यक्ष डी. राम रेड्डी यांनी आगामी काळात असोसिएशनमार्फत हाती घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. असोसिएशनच्या जागेत सभासद व त्यांच्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा सुविधा, क्लब हाऊस, रेस्टॉरंट तसेच पाहुण्यांच्या निवासासाठी ८ ते १० खोल्यांसह विविध अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. या प्रस्तावास उपस्थित सभासदांनी सकारात्मक प्रतिसाद देत त्यास मंजुरी दिली.

चिंचोळी एम.आय.डी.सी. परिसरातील उद्योजकांना भेडसावणाऱ्या वीजपुरवठा व ट्रिपिंगच्या समस्या, स्ट्रीट लाईटची समस्या तसेच औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांच्या प्रश्नांबाबत असोसिएशनमार्फत सातत्याने करण्यात येत असलेल्या पाठपुराव्याची माहितीही रेड्डी यांनी सभासदांना दिली.

सोलापूरची विमानसेवा पुन्हा सुरू होण्याबाबत तसेच नियोजित बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे भविष्यात सोलापूरच्या औद्योगिक विकासाला मिळणाऱ्या संधींबाबत त्यांनी आशावाद व्यक्त केला. तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSME) प्रोत्साहन देण्यासाठी आगामी काळात असोसिएशनमार्फत विविध पुरस्कार देण्यात येणार असल्याची संकल्पना त्यांनी विषद केली.

एम.आय.डी.सी. विभागाकडून उद्योजकांना उपलब्ध असलेल्या विविध ऑनलाइन सेवांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी विशेष सेमिनार आयोजित करण्याची विनंती असोसिएशनमार्फत करण्यात आली असून, यामुळे उद्योजकांना अधिकृत ऑनलाइन प्रक्रियेची माहिती मिळून मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच सभासदांनी असोसिएशनमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सेमिनार, प्रशिक्षण कार्यशाळा आणि विविध बैठकींमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन अध्यक्ष डी. राम रेड्डी यांनी केले. असोसिएशनच्या विविध उपक्रमांना सभासदांकडून मिळणाऱ्या सहकार्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

यानंतर टाटा पॉवर सोलरचे विभागीय सेल्स मॅनेजर यांनी उपस्थित सभासदांना सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे फायदे, शासनाच्या विविध योजना व धोरणे तसेच भविष्यातील ऊर्जा गरजा याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर एज बिझनेस सोल्युशन्स प्रा. लि. यांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या विविध सेवांबाबत उपस्थितांना माहिती दिली.

या कार्यक्रमास असोसिएशनचे अध्यक्ष डी. राम रेड्डी, उपाध्यक्ष गणेश सुत्रावे, सचिव वासुदेव बंग, खजिनदार सप्रेम कोठारी, सहसचिव अभिषेक तापडिया, शिवशंकर आंधळकर, माजी अध्यक्ष व कार्यकारी सदस्य शरदकृष्ण ठाकरे, कार्यकारी सदस्य सिद्धाराम चिट्टे, कमलेश शहा, सौ. रामेश्वरी गायकवाड, तारासिंग राठोड, जयपाल महिंद्रकर, विक्रम बंडेवार यांच्यासह मोठ्या संख्येने उद्योजक व सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असोसिएशनचे व्यवस्थापक शुद्धोधन गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहसचिव शिवशंकर आंधळकर यांनी केले.

# टू व्हीलर असोसिएशन ऑफ सोलापूरची बैठक यशस्वीरित्या संपन्न




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथील टू व्हीलर असोसिएशन ऑफ सोलापूरची वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या संपन्न झाली या सभेत सभासदांच्या अडचणीसह परिवहन विभागाकडून होणाऱ्या तांत्रिक बदलाची माहिती देण्यात आली आणि त्याचा आढावा घेण्यात आला.

अध्यक्ष उल्हास कटकधोंड यांच्या मार्गदर्शनाखाली हॉटेल निसर्ग सोलापूर येथे संपन्न झालेल्या या टू व्हीलर असोसिएशनच्या बैठकीचे नियोजन अति उत्तमरीत्या करण्यात आले होते यामध्ये सभासदांना येणाऱ्या तांत्रिक सोडविण्यावर विशेष भर देण्यात आला.

तसेच परिवहन विभागाकडून वारंवार होणाऱ्या नवीन बदलांचा आढावा देखील यावेळी घेतला गेला या बैठकीत संस्थेचे उपाध्यक्ष राजू कांबळे खजिनदार सुधीर पिंपरे सचिव योगेश जगदाळे यांच्यासह ही बैठक पार पडली.

या या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांनी आपल्या ला येणाऱ्या महत्त्वाच्या अडचणीवर चर्चा केली आणि त्यावर यशस्वीरित्या तोडगा देखील काढण्यात आला. तसेच आजच्या सभेत नवीन सभासदांचा स्वागत आणि सत्कार करण्यात आला. सदर बैठकीस संचालक मंडळासह सर्व सभासद मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# कायदेविषयक व्याख्यानातून विद्यार्थिनींना कायद्याचे मार्गदर्शन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित लक्ष्मीबाई कन्या प्रशाला, यशवंतनगर येथे विद्यार्थिनींमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण व्हावी, तसेच त्यांना आपल्या हक्कांची व कर्तव्यांची माहिती व्हावी या उद्देशाने कायदेविषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ॲड हसीना शेख यांनी विद्यार्थिनींना कायद्याच्या विविध तरतुदींबाबत मार्गदर्शन केले. भारतीय संविधान, मूलभूत हक्क व कर्तव्ये, महिला व बालकांचे हक्क, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच दैनंदिन जीवनात कायद्याचे महत्त्व याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

विद्यार्थिनींनी विचारलेल्या विविध प्रश्नांना ॲड हसीना शेख यांनी समर्पक उत्तरे देत

कायद्याबाबतच्या शंकांचे निरसन केले. कायद्याचे ज्ञान प्रत्येक नागरिकासाठी आवश्यक असून, आपल्या हक्कांसोबतच कर्तव्यांची जाणीव असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. या व्याख्यानामुळे विद्यार्थिनींमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण होऊन त्यांना आपल्या हक्कांची व जबाबदाऱ्यांची जाणीव झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन थोरात मॅडम यांनी केले, तर आभार रणनवरे मॅडम यांनी मानले.

# रेबीज प्रतिबंधासाठी सोलापूरात जनजागृती रॅली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक रेबीज दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. मदर तेरेसा पॉली क्लिनिक, डफरीन चौक येथून रॅलीला सुरुवात झाली. महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात विविध नागरी आरोग्य केंद्रांतील अधिकारी-कर्मचारी, आशा स्वयंसेविका, जीएनएम, एएनएम आणि एमपीडब्ल्यू यांच्यासह ४०० हून अधिक जण सहभागी झाले.



या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे आरोग्य विभागातील सुमारे हजाराहून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकाच वेळी व्हॉट्सॲप स्टेटसद्वारे रेबीज प्रतिबंध, श्वानदंशानंतरचे तातडीचे उपचार, प्रतिबंधात्मक लसीकरण आणि आरोग्यविषयक महत्त्वाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली. त्यामुळे एकाच दिवशी मोठ्या प्रमाणावर जनजागृतीचा संदेश शहरातील नागरिकांपर्यंत पोहोचला.

सकाळी साडेनऊ वाजता आकाशवाणी सोलापूरवर अतिरिक्त आयुक्त (आरोग्य) विना पवार आणि साथरोग तज्ज्ञ डॉ. सुहासिनी वाळवेकर यांची रेबीज प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत विशेष जाहीर मुलाखत प्रसारित करण्यात आली. रॅलीच्या ठिकाणी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही मुलाखत ऐकल्यानंतर अतिरिक्त आयुक्त विना पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात करण्यात आली.

यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश चौगुले, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक सुलेखा पतंगे, आशा गटप्रवर्तक पूजा बाबर तसेच श्वान लसीकरण करणाऱ्या सिस्टर रेशमा तलफदार उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोहेल यांनी केले.

महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी रॅलीचे उत्साहात स्वागत केले. यावेळी उपमहापौर तसेच नगरसेवक अनिल पल्ली यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून रेबीज प्रतिबंधासाठी नागरिकांनी दक्ष राहण्याचे आवाहन केले.

श्वान अथवा अन्य प्राण्याने चावा घेतल्यास कोणतेही घरगुती उपचार किंवा अंधश्रद्धेवर आधारित उपाय न करता तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार रेबीज प्रतिबंधक लसीकरणाचा संपूर्ण कोर्स पूर्ण करावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले.

रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी कोहिनूर इन्स्टिट्यूट, सोलापूरचे मॅनेजर वल्लभ कुलकर्णी यांचे विशेष सहकार्य लाभले. संस्थेतर्फे बॅनर्स, पोस्टर्स आणि जनजागृतीपर फलक उपलब्ध करून देण्यात आले.

रेबीजमुक्तीसाठी नागरिकांनीही आरोग्य विभागाच्या आवाहनाला प्रतिसाद देत श्वानदंशाच्या घटनांमध्ये तातडीने वैद्यकीय उपचार घेऊन आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले.

# एम. बी. चव्हाण गुरुकुलचा हॉलीबॉल स्पर्धेत दिमाखदार विजय



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** नेताजी प्रशाला, मोहोळ येथे आयोजित तालुकास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत श्रीकृष्ण गुरुकुल शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनाखाली कार्यरत असलेल्या एम. बी. चव्हाण गुरुकुल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कामती खुर्दच्या हॉलीबॉल संघाने जगदंब विद्यालय, पोखरापूर संघावर मात करत दिमाखदार विजय मिळविला.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यात एम. बी. चव्हाण गुरुकुलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, आत्मविश्वास आणि जिद्दीचे प्रदर्शन करत विजय संपादन केला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे एम. बी. चव्हाण गुरुकुलच्या विजेत्या संघाची जिल्हास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संघाच्या या यशाबद्दल श्रीकृष्ण समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रमोद अवताडे, उपाध्यक्ष हनुमंत निकम (मामा), प्राचार्य प्रा. प्रतिक जगदाळे, खजिनदार आप्पासाहेब कोळी सर, क्रीडा शिक्षक प्रा. आकाश भद्रशेट्टी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करून पुढील जिल्हास्तरीय स्पधेर्साठी शुभेच्छा दिल्या.

खेळाडूंच्या या यशामुळे एम. बी. चव्हाण गुरुकुलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला असून, जिल्हास्तरीय स्पर्धेतही संघाने उत्तम कामगिरी करावी, अशा शुभेच्छा सर्व स्तरातून व्यक्त होत आहेत.

# लायन्स क्लब अक्कलकोटच्या वतीने निसर्ग सहल व वृक्षारोपण




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटच्या वतीने कर्जाळ, येथील संजय देशमुख यांच्या फार्म हाऊसवर क्लबच्या सदस्यांसाठी निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फार्म हाऊसच्या परिसरात क्लबच्या सर्व सदस्यांच्या हस्ते 15 नारळाच्या झाडांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमानंतर सर्व सदस्यांनी फार्म हाऊस परिसरातील निसर्गसौंदयार्चा मनसोक्त आनंद घेतला.

दुपारी लायन्स डिस्ट्रिक्ट 3234 D1, झोन क्क्र चे झोन चेअरमन ला. स्वामीनाथ कलशेट्टी यांची लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटला अधिकृत भेट आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी क्लबच्या विविध सेवा व सामाजिक उपक्रमांची माहिती जाणून घेतली. क्लबच्या कार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून क्लबच्या उपक्रमांचे कौतुक केले तसेच भविष्यातील सेवा कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास क्लब अध्यक्ष ला. अभय खोबरे, सचिव ला. शिरीष पंडित, खजिनदार ला. विठ्ठल तेली, संस्थाध्यक्ष ला. राजेंद्र हत्ते, तसेच क्लबचे इतर सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते. याशिवाय संजय देशमुख व डॉ. सुवणार्ताई मलगोंडा यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट यांच्यावतीने डॉं. सुवणार्ताई मलगोंडा यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर सर्व सदस्यांनी सहभोजनाचा आनंद घेतला.